**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**

**टोल फ्रि क्रमांक १०६४**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- २४.०५.२०१९**

**ग्रामपंचायत मौजे पावसे पांगरी ता.अंबड जि.जालना येथील ग्रामसेवक श्रीमती मनिषा महापुरे यांना 10,000/- रुपयाची लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे त्यांचेवर गुन्हा दखल केला.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्तां | :- | श्रीमती मनिषा पावलसराव महापुरे वय ३२ वर्ष,व्यवसाय-नौकरी,ग्रामसेविका,ग्रामपंचायत-पावसे पांगरी , पंचायत समीती अंबड ता.अंबड जि.जालना.,ह.मु. सुरंगेनगर वाघमारे यांचे घरी अंबड ता.अंबड जि.जालना ,मुळ रा.किनगाव ता.अंबड जि.जालना |
| २ | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.०३.०५.२०१९ रोजी पंचायत समिती अंबड येथे. |
| ३ | लाचेची रक्कम | :- | १०,०००/- रुपये |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.व्ही.एल.चव्हाण , पोलीस निरीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना. |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, तक्रारदार यांनी तीन महीण्यापुर्वी मौजे पावसे पांगरी ता.अंबड येथे दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत नळपाई लाईन चे काम सचिन म्हस्के यांच्या सोसायटीवर केलेले आहे.सदर काम हे १० लाख रुपयाचे असून त्यापैकी तक्रारदार यांना ७,३०,०००/-रुपये बील मिळालेले असुन उर्वरीत बील ९०,७००/-रुपये बाकी आहे. तक्रारदार यांनी ग्रामसेविका श्रीमती महापुरे यांना भेटून सदर उर्वरीत बील ९०,७००/-रुपयाचे बिलाचे चेक द्रेण्याची विनंती केली असता ,ग्रामसेविका श्रीमती महापुरे हया तक्रारदार यांना म्हणाल्या की, आम्हाला बीडीओ. साहेबांना पैसे द्यावे लगातात तेव्हा तुम्ही मला १०,०००/- रुपये दिल्या शिवाय चेक दिला जाणार नाही. तेव्हा तक्रारदार हे ग्रामसेविका श्रीमती महापुरे यांना नाईलाजास्तव हो म्हणाले पण मला पुर्ण उर्वरीत रकमेचा चेक देवून टाका तेव्हा ग्रामसेविका श्रीमती महापुरे यांना तक्रारदार यांना सदर कामाचा ६०,०००/-रुपयाचा चेक दिला. व ३०,७००/-रुपयाचा चेक दिला नाही. तेव्हा तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कर्यालय जालना येथे तक्रार दिली.

त्यावरुन दि.०३/०५/२०१९ रोजी तक्रारदार हे श्रीमती महापुरे यांना पंचायत समीती अंबड जि.जालना येथे पंचामसक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता ग्रामसेविका श्रीमती महापुरे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे वरील कामाचे ६०,०००/- रुपये बिलाचे चेक दिल्याचा मोबदला व उर्वरीत रक्कम ३०,७००/- रुपये बीलाचा चेक देण्यासाठी पंचासमक्ष तडजोडअंती १०,०००/-रुपयाची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यावरुन दि.२४/५/२०१९ रोजी पो.ठाणे अंबड येथे वरील आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.७९७२७२६१०१ पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना